सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, कराड

विद्यानगर, कराड ता. कराड जि. सातारा ४१५ १२४.

फोन नंबर (02164) 271 462 ई-मेल - gpkarad.dte@gmail.com

जा.कं.शातंक/विवि/२०२५-२०२६/हि.परीक्षा अर्ज २०२५/1821 दिनांक – 3 0 AUG 2025

अत्यंत महत्वाचे परिपत्रक-

**विषय – हिवाळी परीक्षा -२०२५ करीता नियमित व्दितीय व तृतिय वर्षाचे परीक्षा अर्ज व बॅकलॉग विषयाचे परीक्षा अर्ज भरणे बाबत..**

संदर्भ –१) मा.सचिव, मरातंम, मुंबई -५१ यांचे परिपत्रक क्रं जा.क्रं.मरातंशिमं/का-४०/परीक्षा विभाग-एफ-१/२०२५/-- दि –

संदर्भ क्रं .१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता **हिवाळी परीक्षा -२०२५** साठी नियमित व्दितीय व तृतिय वर्षाचे परीक्षा अर्ज व बॅकलॉग विषयाचे परीक्षा अर्ज मंडळाचे **https://msbte.ac.in** संकेतस्थाळवर खालील वेळापत्रकानुसार भरणेचे आहेत. परीक्षा अर्ज भरलेनंतर त्याची प्रिंट स्पष्ट दिसेल अशी काढून त्याच्यावर मोबाईल क्रमांक , रोल क्रमांक लिहावा. सदर संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरुन विद्यार्थी विभागातील खालील वेळापत्रकानुसार कर्मचारी यांचेकडून परीक्षा शुल्क तपासून व नोंद करुन कार्यालयातील रोखपाल यांचेकडे आवश्यक शुल्कासह खालील वेळापत्रकानुसार परीक्षा अर्जाची प्रिंट व रक्कम **रोखपाल यांचेकडेच जमा करणेचा आहे याची नोंद घ्यावी .,अन्यथा संबंधित विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज कन्फर्म केला जाणार नाही व त्यामूळे हिवाळी परीक्षा -२०२५ परीक्षेमध्ये परीक्षेपासून वंचित राहीलेस होणा-या परीक्षे अभावी शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील याची सर्व संबंधित विद्यार्थ्यानी नोंद घ्यावी.**

**हिवाळी परीक्षा--२०२५ करीता नियमित व्दितीय व तृतिय वर्षाचे परीक्षा अर्ज व बॅकलॉग विषयाचे परीक्षा अर्ज भरणे बाबत- वेळापत्रक**

| अ. क्रं. | शुल्क प्रकार | कालावधी | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| ०१ | नियमित शुल्क रु ८५०/- | दिनांक ०२/०९/२०२५ ते दिनांक १२/०९/२०२५ पर्यंत वेळ १०.३० ते १.३०, २.३० ते ४.३० वाजेपर्यंत | ८५०/- |
| ०२ | नियमित शुल्क + रु २००/- रुपये दंड. | दिनांक १३/०९/२०२५ ते दिनांक १६/०९/२०२५ पर्यंत वेळ १०.३० ते १.३०, २.३० ते ४.३० वाजेपर्यंत | १०५०/- |
| ०३ | नियमित परीक्षा शुल्क + रु १५००/- रुपये दंड. | दिनांक १७/०९/२०२५ ते दिनांक १९/०९/२०२५ पर्यंत वेळ १०.३० ते १.३०, २.३० ते ४.३० वाजेपर्यंत | २३५०/- |

**खालील कर्मचारी यांचेकडून विद्यार्थ्यांनी वरील दिनांकाप्रमाणे परीक्षा अर्ज तपासून घेणेचे आहेत.**

| अ.क्रं | परीक्षा अर्ज तपासणी करणा-या कर्मचा-यांचे नांव | वर्ग/वर्ष |
|---|---|---|
| ०१ | श्री. अे.व्ही. जोशी, डाटा एन्ट्री ऑपरेटर. | स्थापत्य अभि, संगणक अभि - प्रथम , व्दितीय व तृतिय वर्ष<br>उपकरणीकरण - प्रथम , व्दितीय व तृतिय वर्ष |
| ०२ | श्री. जे.डी.कुंभार, वरिष्ठ लिपिक | यंत्र अभि., विद्यूत अभि - प्रथम , व्दितीय व तृतिय वर्ष<br>अणुविद्युत व दुरसंचारण अभि- प्रथम , व्दितीय व तृतिय वर्ष<br>मेकॅट्रॉनिक्स- प्रथम , व्दितीय व तृतिय वर्ष |

वरील वेळापत्रकाप्रमाणे विहीत कालावधीत परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची जबावदारी विद्यार्थ्यांची राहील. परीक्षा अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास विद्यार्थी विभागात वरील संबंधित कर्मचारी यांचेशी त्वरीत संपर्क साधावा. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यास हिवाळी परीक्षा-२०२५ करीता परीक्षेस बसता येणार नाही याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी ज्या अभ्यासक्रमात Optional / Elective विषय देण्यात आलेले आहेत त्यापैकी Elective या विषयाचे सत्रकर्म (Term Work) पूर्ण केले आहे तोच विषय परीक्षा अर्जात नमूद करावा. सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी आपला Elective Subject असले बाबतची विभाग प्रमुखाकडून खात्री करावी.

तसेच परीक्षा अर्ज तपासणी करणा-या वरील विद्यार्थी विभागातील संबंधित कर्मचा-यांना कळविणेत येते की, त्यांनी विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज काळजीपूर्वक तपासून फी मार्कींग करुन रोखपाल यांचेकडे परीक्षा शुल्क भरणेसाठी पाठविणेचे असून संबंधित कर्मचारी यांनी सदरचे विद्यार्थ्यांनी भरलेले परीक्षा अर्ज दररोज वरील परीक्षा शुल्क नमूद केलेप्रमाणे शाखा निहाय रोखपाल यांचेकडून हिशोबासह घेवून परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क याचा ताळमेळ घेवून व तशी स्वतकडे दिनांकनिहाय विद्यार्थ्यांनी भरलेले परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क याची नोंद ठेवणेची आहे. तसेच संबंधित कर्मचारी यांनी वर्ग/वर्ष तसेच दिनांकाप्रमाणे परीक्षा अर्ज अचूक कन्फर्म करुन कन्फर्म केलेनुसार परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क बरोबर आहे या बाबत दररोज खात्री करणेची आहे याची प्राधान्याने नोंद घ्यावी.

(डॉ. सुरेश आ. पाटील)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कराड.

प्रत- मुख्य सूचना फलकावर सर्व संबंधित विद्यार्थ्यांना माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत- वरील संबंधित कर्मचारी यांना माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.(प्र.प्रबंधक यांचे मार्फत)

प्रत- सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी (त्यांनी सदर सूचना विद्यार्थ्यांच्या whatsapp ग्रुपवरती पाठवावी.)

**प्रत- रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, कराड यांना महितीसाठी .**

2/- त्यांना कळविणेत येते की, विद्यार्थी विभागातील कर्मचारी यांची परीक्षा अर्जावर सही , दिनांक व रक्कम इत्यादी बाबतचा शेरा असल्यानंतरच परीक्षा अर्ज स्विकारावे. तसेच विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क भरल्यानंतर रोखपाल यांनी दिवसभरातील जमा झालेले सर्व परीक्षा अर्ज संध्याकाळी विद्यार्थी विभागाच्या वरीलप्रमाणे कर्मचारी यांचेकडे देवून त्याची नोंदवहीमध्ये पोहोच घ्यावी. तसेच परीक्षा शुल्काचा व परीक्षा अर्जाचा हिशोब जूळणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

प्रत- संगणक विभाग, शा.तं.कराड यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.